

# श्री सूर्यदेवाची आरती-जय जय जगत्महरणा दिनकर

https://www.chalisa.online

जय जय जगत्महरणा दिनकर सुखकिरणा ।
उदयाचल जगभासक दिनमणि शुभस्मरणा ॥
पद्मासन सुखमुर्ती सुहास्यवरवदना ।
पद्मकरा वरदप्रभ भास्वत सुखसदना ॥ १ ॥

जय देव जय देव जय भास्कर सूर्या ।
विधिहरिशंकररूपा जय सुरवरवर्या ॥ ध्रु॥

कनकाकृतिरथ एकचक्रांकित तरणी ।
सप्ताननाश्वभूषित रथि ता बैसोनी ॥
योजनसहस्त्र द्वे द्वे शतयोजन दोनी ।
निमिषार्धे जग क्रमिसी अद्भुत तव करणी ॥ जय ॥ २ ॥

जगदुद्भवस्थितिप्रलय-करणाद्यरूपा ।
ब्रह्म परात्पर पूर्ण तूम अद्वय तद्रूपा ॥
तत्त्वपदव्यतिरिक्ता अखंड सुखरूपा ।
अनन्य तव पद मौनी वंदित चिद्रूपा ॥ जय ॥ ३ ॥

|| https://www.chalisa.online ||